वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक–अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार–शनिवार दि.२९ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# नगराध्यक्षपदाचे उमेदवार प्रेमलता पारवे यांच्यासह सर्व नगरसेवक पदांच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी अजितदादांची तोफ बीडमध्ये

Email.- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email.-editordivyawarta@gmail.com



## अतिविराट सभा आणि बीडमध्ये मुक्काम

## कुठे घडीचा टाईम बिघडत असेल तर तो टाईम आज रात्रंभर अजितदादा जुळविणार

## अपघातात जखमी झालेले फारूक पटेल यांच्या घरी पोहंचून तब्येतीची केली विचारपूस

### राष्ट्रवादी भवन ते सर सय्यद उर्दु शाळेसमोरील रस्त्याच्या संदर्भात डीपीओला अजितदादांनी झपझापले



बीड, (दिव्य न्युज):- बीड नगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेसच्या घड्याळाच्या ताब्यता द्या, मराठवाड्यात प्रथम क्रमांकाची पालिका बनविण्याबरोबरच बीड जिल्ह्याचा पालकमंत्री या नात्याने बारामतीच्या धर्तीवर पालिकेत सर्व सुविधा पुरिवण्याचे आश्वासन देत या पालिकेत ३५ वर्षे सत्ता भोगून शहराला भकास करणाऱ्यांना या निवडणुकीत

▶▶ पान २ वर

## राष्ट्रवादीचे शिलेदार फारूक पटेल यांच्या घरी भेट केली तब्येतीची विचारपूस



चार दिवसापुर्वी बीडमध्ये अजित पवार यांची अजित पवार यांची सभा आयोजित करण्यात आली होती. सभेला जातांना अचानकपणे मोटार सायकल घसरल्याने फारूक पटेल आणि शेख मुजीब यांचा अपघात झाला होता. या अपघातात फारूक पटेल याच्या पायाला दुखापत झाली डॉक्टरांनी प्लास्टर करून ४० दिवस विश्रांती घेण्याचा सल्ला दिला ऐन निवडणुकीत ही घटना घडल्याने त्यांच्य समर्थकांना झटका असला होता. खचून जावू नये म्हणुन आज थेट राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित पवार यांनी फारूक पटेल यांच्या निवासस्थानी भेट दिली, त्यांच्या तब्येतची विचार पूस केली आणि लवकर बरे होवून या निवडणुकीत पुन्हा त्याच जोमाने कामाला लागण्याचे मनोपुर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण माजी सभापती तथा प्रभाग क्रं.१८ चे राष्ट्रवादीचे उमेदवार आशफाक इनामदार यांच्यासह जेष्ठनेते मोईन मास्टर यांची उपस्थिती होती.

# आ.सुरेश धस यांच्यापासून माझ्या जीवाला धोका

## ॲड. असीम सरोदेंचा खळबळजनक दावा



फोटो २२

पुणे , (दिव्य न्युज):- जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते राम खाडे यांच्यावर बुधवारी रात्री जीवघेणा हल्ला झाल्याची खळबळजनक घटना घडली. १० ते १५ जणांच्या टोळक्याने त्यांच्यावर धारदार शस्त्रांनी हल्ला केला आहे. या घटनेनंतर राम खाडे यांच्या पत्नी तुळसा खाडे यांनी प्रतिक्रिया दिली. आमदार सुरेश धस यांनीच हलाले घडवून आणल्याचा थेट आरोप राम खाडे यांच्या पत्नीने केला होता. त्यानंतर, आता आमदार सुरेश धस यांच्यापासून आपल्या जीवाला धोका असल्याचा दावा पुण्यातील नावाजलेले वकील ड. असीम सरोदे यांनी केला आहे. धस यांच्या समर्थकांनी ज्या खाडे नावाच्या व्यक्तीला मारहाण केली, त्या व्यक्तीच्या नातेवाईकांकडून

▶▶ पान २ वर

# मुख्यमंत्री फडणवीस यांची १ डिसेंबरला बीडमध्ये सभा

## सभेमुळे भाजपच्या प्रचाराला ऊर्जा मिळेल–डॉ.योगेश क्षीरसागर



बीड, (दिव्य न्युज):- बीड नगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने जोरदार तयारी सुरू केली असून, या प्रचारातील महत्त्वाचा टप्पा म्हणून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बीडमध्ये १ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता विजय संकल्प सभा आयोजित करण्यात आली आहे. या विजय संकल्प सभेमुळे भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योतीताई रविंद्र घुमरे यांच्यासह नगरसेवकांच्या विजयावर शिक्कामोर्तब होणार आहे.

या सभेला राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, भाजपचे आमदार, पदाधिकारी, नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी निवडणुकीच्या रिंगणात असलेले उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या

▶▶ पान २ वर

# या फ्लॉब भुयारी गटार योजनेचे श्रेय युवराज घेणार का?

## अठरा कोटी खर्चूनही डोक्याला तापच



बीड,(दिव्य न्युज):- मागील १० वर्षे गवगवा झालेली, पालिकेतील सत्ताधाऱ्यांच्या प्रत्येक भाषणात प्रमुख मुद्दा असलेली भुयारी गटार योजना अर्धवट ठेवून अखेर गुंडाळण्यात आली. मात्र, अर्धवट केलेल्या योजनेतील पाइपलाइनला जागोजागी लोखंडी कड़ा असलेली सिमेंटचे द्वापे रस्त्याच्या मधोमधच आहेत. त्यामुळे बीडकरांना अपघाताची भीती आणि डोक्याला ताप कायम आहे. या अर्धवट योजनेमुळे शासनाच्या तिजोरीतून १८ कोटी रुपयेही गटारात गेले आहेत.

बीडमध्ये सहा वर्षांपूर्वी भुयारी गटार योजना हाती घेण्यात

▶▶ पान २ वर

# क्रुर हत्येला वर्षेपूर्ण, न्यायाची प्रतिक्षा

## धनंजय मुंडेना सहआरोपी करा–मनोज जरांगे पाटील



बीड , (दिव्य न्युज):- संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून टाकणाऱ्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाला आज (२९ नोव्हेंबर २०२५) एक वर्ष झाले आहे. दरम्यान, देशमुख कुटुंबाचा आणि मस्साजोग ग्रामस्थांचा न्यायाचा लढा आजही सुरू आहे. या प्रकरणातील क्रूरकर्मींना शिक्षा झाली पाहिजे, हा आमचा एकच उद्देश असल्याची माहिती दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी दिलीये.ही गुन्हेगारी संपवणार असल्याचा शब्द आम्हाला मुख्यमंत्र्यांनी दिला असल्याचेही ते म्हणाले आहेत. प्रथम पुण्यस्मरण निमित्त आज मस्साजोग येथे कीर्तनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याचेही

▶▶ पान २ वर

# सोळंके रोज दीड कोटी रूपये घरी नेतात–चाऊस

## चाऊस तुम्ही नऊ महिने जेलमध्ये कसे होता–आ.सोळंके



माजलगाव , (दिव्य न्युज):- आमदार प्रकाश सोळंकेङ्गङ्गहे टक्केवारीच्या माध्यमातून दररोज दीड कोटी रुपये घरी घेऊन जातात, असा आरोप येथील माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस' यांनी केला. त्यावर सहाल चाऊस तुम्ही नऊ महिने जेलमध्ये कसे काय होतात, असा सवाल आमदार प्रकाश सोळंके यांनी केला आहे. आरोप–प्रत्यारोपामुळे माजलगावातील वातावरण ढवळून निघाले आहे.ङ्गङ्गराष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नगराध्यक्ष, नगरसेवकाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ कॉर्नर बैठकीमध्ये सहाल चाऊस म्हणाले की, आमच्या घरातील तीन उमेदवार आहेत. असे ते सांगत सुटले; परंतु त्यांचे संपूर्ण खानदान राजकारणात आहे. त्यामुळे त्यांनी आमच्यावर बोलू नये. आम्हाला ईडी व सहकार खात्याची कार्यालये माहिती आहेत; परंतु आम्ही अशी कामे करत नाहीत. नगराध्यक्ष असताना नगरपालिकेत तुम्ही भ्रष्टाचार केला नसेल तर तुम्ही जेलमध्ये कसे काय होतात, असा सवाल करत पुन्हा नगरपालिकेत भ्रष्टाचार वाढवायचा आहे का? असा सवाल करत सहाल चाऊस यांना घरी बसवा, असे आवाहन

▶▶ पान २ वर

# विकास कामांना अडथळा आणणाऱ्यांना घरी बसवा

## कमळ समोरील बटन दाबून विजयी करा–जयदत्त क्षीरसागर



बीड , (दिव्य न्युज):- शहरातील प्रभाग क्रमांक २ मधून आम्हाला कायमच मतांची आघाडी मिळाली आहे. त्यामुळे या प्रभागावर विशेष लक्ष देऊन विकासकामे करण्यात आली आहेत. पूर्वी येथे केवळ अरुंद रस्ता होता. तो रुंद करून मोठा व दर्जेदार रस्ता तयार करण्यात आला. पूर्वीचा आणि आजचा रस्ता यातील फरक नागरिकांच्या लक्षात येतो. बीडकरांची आजपर्यंत जशी साथ मिळाली, तसेच यापुढेही मिळणार, याची मनात तीळमात्र शंका नाही, असा विश्वास माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

शहरातील नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ. ज्योती घुंबरे, प्रभाग क्रमांक २ मधील भाजपचे उमेदवार शुभम दिलीप धूत, सावित्री नितीन साखरे यांच्या प्रचारार्थ जयदत्त क्षीरसागर यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दिनकरराव कदम, सखाराम मस्के, माजी नगरसेवक भारत यादव, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, अजय सवाई, संगीताताई धसे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या

▶▶ पान २ वर

## प्रभाग क्रं. १६ मधील मतदारांनी घेतली हीतात निवडणूक

# फारूक पटेल, नुझत आरा शहाबाज यांना नगरसेवक करायचच





बीड, (दिव्य न्यूज):- बीड शहरातील प्रभाग क्रं. १६ च्या निवडणुकीकडे बीडकरांचे लक्ष लागून आहे. कारण या प्रभागातून बीड शहराचा विकासाचा चेहरा मोहरा बदलणारे आणि विकास काय असतो हे स्वतःच्या प्रभागात करून दाखविणारे नगरसेवक म्हणजे फारूक पटेल. फारूक पटेल यांचे काम कामचं बोलले. प्रभागात दर्जेदार सिमेंट रस्ते, पाईपलाईन, विद्युत चे कामे, स्वच्छतेचे कामे, पाण्याचा प्रश्न त्यांनी कायमचे निकाली काढले आहेत. स्वतःच्या प्रभागात मुभलक आणि भरपुर पाणी मिळावे या करीता हजारो लिटरची पाण्याची टाकीच उभी केली. सामाजिक काम असो की राजकीय प्रत्येकांना आठवण येते ते म्हणजे फारूक पटेल यांची.... रोड, नाली, रस्ता हिच कामे फारूक पटेल करत नाहीत तर त्यांचे सर्वात महत्वाचं आणि जबाबदारीचे काम म्हणजे रूग्णांना मदत करायची. रात्री अपरात्री कितीही वाजता त्यांना फोन केला तर ते मागे पुढे न पाहता अडचणीत आलेल्यांना मदत करण्यासाठी तात्काळ दवाखान्यात धाव घेतात. कोविडच्या काळात केलेले त्यांचे काम कोणीही कधी ही विसरणार नाही. त्या काळात एखादा व्यक्ती कोरोना बाधीत झाल्यावर त्या रूग्णाकडे कोणीही जात नव्हते. स्वतःचे नातेवाईक आणि उपचारा करणारे लांब राहुन उपचार करत होते. अशा या कठीण काळात फारूक पटेल यांनी आपले कर्तव्य समजून या रूग्णांना मदत केली. हे ते रूग्ण कधीच विसरणार नाहीत. प्रभागच नव्हे तर संपूर्ण शहरात कसा विकास कामे करता येतील याकडे त्यांचे लक्ष असते. प्रत्येक कामांकडे त्यांचे बारकाईने लक्ष असते अशा या अतिउत्तम कामगिरी करणाऱ्या फारूक पटेल यांना प्रभागातील मतदारांनी भरभरून प्रतिसाद देण्याचे वचन दिले असून त्यांच्या सोबत असणारे शेख जमील भाई यांचे सुन स्व.शाहबाज उर्फ शब्बो यांची पत्नी निवडणुकीच्या रिंगणात असून या दोघांनाही मतदारांकडून भरभरून प्रतिसाद मिळत आहे.

### शाहबाज उर्फ शब्बो यांचा नगरसेवक होण्याचे स्वप्न प्रभागातील मतदार पूर्ण करून देण्यासाठी सरसावले

ही बातमी करतांना अक्षरशः डोळ्यात पाणी येत आहे. त्याचे कारण शेख जमिल भाई यांचे सुपुत्र आणि प्रत्येकांच्या सुख दुःखात नेहमी सहभागी असणारे आणि प्रत्येकांशी प्रेमाने बोलणारे स्व.शाहबाज उर्फ शब्बो यांचे नगरसेवक होण्याचे स्वप्न होते. ते त्यासाठी अनेक वर्षापासून प्रयत्न करत होते. पण काही महिन्यापुर्वी त्यांचे एक मोठ्या आजाराने दुर्दैवी निधन झाले. पण आज प्रभागातील मतदारांना त्यांची आठवण येत आहे. शाहबाज उर्फ शब्बो यांचे नगरसेवक होण्याचे स्वप्न होते. ते त्यासाठी रात्रंदिवस सामाजिक कार्यात अग्रेसर होते. पण ते त्यांच्या नशीबी नव्हते. आज मतदारांच्या हाती त्यांचे स्वप्न पुर्ण करण्याची संधी मिळाली म्हणूनच मतदारांनी ठरविले की, शाहबाज उर्फ शब्बो यांच्या पत्नी नुझत आरा यांना नगरसेवक करून शाहबाज उर्फ शब्बो यांचे अपुर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करण्याचे विडाच मतदारांनी उचललेला आहे.






# केजजवळ पहाटे एसपींच्या गाडीचा मोठा अपघात



बीड, (दिव्य न्युज):- येथील पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्या गाडीचा अपघात झाल्याची घटना पहाटे ३ ते ३.३० च्या सुमारास घडली आहे.सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती आहे. केजजवळ एका पोलवर गाडी धडकल्याने ही घटना घडल्याचे सांगितले जाते.

काल रात्री पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत परळीच्या विद्यानगर भागात गोळीबार झाल्यामुळे तातडीने गेले होते.रात्री उशिरा परळीवरून वापस येताना गाडी वेगात असल्याने केजजवळ एका पोलवर धडकली.यावेळी कारमधील सर्वांनी सीट बेल्ट लावल्यामुळे मोठा अनर्थ टळला.या अपघातात गाडीचे काही नुकसान झाले असून कोणतीही जीवितहानी मात्र झाली नाही.मिळालेल्या माहितीनुसार पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्यासोबत आरटीपीसी गणेश थापाडे,चालक राहेकोल आणि क्यूआरटीचे पथक देखील सोबत असल्याचे कळते.

मी सुखरूप,काळजी करण्याचे कारण नाही–कॉवत अपघाताची घटना कळल्यानंतर पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्याशी 'प्रजापत्र' च्या वतीने संपर्क केला असता त्यांनी काळजी करण्याचे कारण नाही अशी प्रतिक्रिया देत मी आणि माझी टीम सुखरूप असल्याचे सांगितले.गाडीत आम्ही सर्वांनी सीट बेल्ट लावले होते म्हणून कोणतीही अप्रिय घटना घडली नाही असे ते म्हणाले.

# केजमध्ये युवकाची गळफास घेऊन आत्महत्या



केज (दिव्य न्युज):- एका युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना साबला (ता. केज) येथे शुक्रवारी (दि. २८) दुपारी पावणे एक वाजेच्या सुमारास घडली.

साबला येथील रामेश्वर अशोक पांचाळ हा युवक केज येथील वसंत विद्यालयात इयत्ता बारावीच्या वर्गात शिक्षण घेत होता. शुक्रवारी दुपारी पावणे एक वाजेच्या सुमारास रामेश्वर पांचाळ याने राहत्या घरातील पत्र्याच्या आडूला गळफास घेऊन आत्महत्या केली. त्याने आत्महत्या करण्यामागचे कारण स्पष्ट झाले नव्हते. या घटनेची माहिती मिळताच जमादार प्रल्हाद चव्हाण, पोलीस नाईक प्रकाश मुंडे यांनी घटनास्थळी भेट देऊन मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठवून दिला. ज्ञानेश्वर पांचाळ यांच्या खबरेवरून केज पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पान ४ वरून

## प्रभागाच्या सर्वांगिण

सामाजिक क्षेत्रात असून या पुर्वी त्यांच्या विरोधात निवडणूक लढवून निवडून आलेले उमेदवाराला मतदारांनी कधीच पाहिले नाही आज प्रभागात कचऱ्याचे ढिग लागले आहे रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहे, गटारी तुडूंब भरले आहे, गल्ली गल्लीत घाण साचलेली आहे रस्त्यावरचे पोल अजुन बसविलेले नाही अशा या नगरसेवकाला आता कायमचा बाजुला करत या प्रभागातून शेख शफिक यांच्या पत्नीला तिसऱ्यांदा विजय करण्याचा निश्चय मतदारांनी केला आहे.

## माझा परिचय –

घरच्या समस्येला सोडवताना पहिले. मी दहा वर्षे वॉर्ड सदस्य म्हणून काम केलं त्या काळात पहाटेच कामगारांसोबत गटारे स्वच्छ करताना, कचरा उचलताना, पाणीपुरवठ्याचे पाइप तपासत असताना आपण मला पाहिलंय.

मी तुमच्या प्रत्येक घराशी जोडलेला आहे. तुमची दु:खं, तुमचे प्रश्न, तुमचे राग–मी स्वतः अनुभवले आहेत. माझ्यासाठी हे फक्त वॉर्ड नाही हा माझा परिवार आहे. पण मागील निवडणुकीत, तुम्ही मला भरभरून मतं दिली आता ही आपल्या अमुल्य मत देवून विजय करावे .

## प्रभाग क्र.२०

पाईपलाईन करून सर्वांना नळ कनेक्शन दिले आहे. प्रभागातील अनेक गरजुवंताना घरकुल मिळवून दिले तसेच प्रभागातील गरजु लोकांना संजय गांधी , श्रावणबाळ योजना मिळवून दिली अशा या उत्तम कामगिरी करणाऱ्या सय्यद मुजीब ए वन यांना या प्रभागाचे नगरसेवक म्हणून निवडून देण्याचा निश्चय प्रभागातील मतदारांनी केला आहे त्यांचे सोबत अपक्ष उमेदवार शेख पाशा भाई यांना ही या निवडणूकीत निवडून देण्याचे निश्चय केले असून मागील निवडणूकीत त्यांचा अवघ्या १७ मतांनी निसटता पराभव झाला होता म्हणून आता या प्रभागातून छत्री आणि टेलीफोन या दोन्ही चिन्हासमोरील बटन दाबवून त्यांना विजय करण्याचा विळा प्रभागातील मतदारांनी उचलला आहे.

## युवा नेता इम्रान

यांनी सांगितले की, मुखीद लाला हे विकासाभिमुख, सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी लढणारे, प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ कार्यकर्ते आहेत. वार्ड क्रमांक १८ च्या सर्वांगीण विकासासाठी त्यांची निवड अत्यावश्यक आहे. तसेच प्रभागातील सर्व मतदारांनी तुतारी या निवडणूक चिन्हावर बटन दाबून प्रचंड मतांनी विजय मिळवून द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. या पाठिंब्यामुळे तुतारीच्या बाजूने वातावरण मोठ्या प्रमाणावर फिरू लागले असून, वार्ड १८ मधील निवडणूक अधिक रंगतदार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राजकीय वर्तुळात या घडामोडींना विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, आगामी काही दिवसांत प्रभाग १८ मध्ये प्रचार अधिक तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

## बाळासाहेब गुंजाळांना

झालेला आहे, हा भाग अगोदर ग्रामीण म्हणून ओळखला जायचा मात्र आता या भागात बाळासाहेब गुंजाळ यांनी विकास करून या वॉर्डाला स्मार्ट सिटी चा दर्जा दिला. या निवडणुकीत बाळासाहेब गुंजाळ आणी पायल जाधव या अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाच विकासाचं व्हिजन घेऊन या निवडणुकीत उतरले आहेत.अजित पवार हेच बीडचा विकास करू शकतात आणी याच विकासाची गंगा पेठबीड भागात यावी म्हणून अमरसिहं पंडित आणी आमदार विजयसिहं पंडित यांच्या नेतृत्वात बाळासाहेब गुंजाळ हे विकास् दूत झाले असून या पेठ बीड भागाचा विकास् करायचा असेल तर पायल जाधव आणी बाळासाहेबाना गुलाल लावा असा चंग महिलांनी केला आहे आणी पेठ बीड भागात वॉर्ड क्रमांक २१ ची निवडनुक महिलांनी हाती घेतली आहे..त्यामुळे बाळासाहेब आणी पायल जाधव याचा विजय निश्चित झाला आहे

## प्रभाग क्र.८

यांचे चिन्ह तुतारी वाजविणारा माणुस आणि मशाल या चिन्हा समोरील बटन दाबवून त्यांना विजय करण्याचे ठरवले आहे. गेल्या चार पाच दिवसापासुन या दोन्ही उमेदवारांनी सर्व मतदारांची गाटी भेटी घेतली अनेकांनी आशिर्वाद ही दिले हे प्रभाग उच्च शिक्षित मतदारांचा असल्याने येथील मतदार कोणाच्या ही भुलथापाना बळी पडणार नाही प्रभागाच्या विकासासाठी बीडचे आमदार संदिप भैय्या क्षीरसागर, मा.आ.सय्यद सलिम यांचे हात मजबुत करून या दोन्ही उमेदवारांचे चिन्ह तुतारी वाजविणारा माणुस चा जोरदार आवाज निघत असून मतदारांनी विजयाची मशाल ही पेटवली आहे.

पान १ वरून

## नगराध्यक्षपदाचे उमेदवार

त्यांची जागा दाखवुन द्या तसेच राष्ट्रवादीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. प्रेमलताताई पारवे यांच्यासह सर्वच प्रभागातील नगरसेवक पदाच्या उमेदवारांना विजयी करा असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.शहरामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगराध्यक्षपदाच्या व नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ बशीरगंज चौक येथे आयोजित सभेत ते बोलत होते. पुढे बोलतांना ना. अजित दादा महणाले की, बीड नगरपालिका मराठवाड्या प्रथम क्रमांकाची बनविणार असुन बारामतीला पहाटे स्वच्छता दररोज होते त्याच धर्तीवर बीडमध्ये स्वच्छता करणार, सत्तेमध्ये राहन प्रभावी काम करता येते. आम्ही लोकांच्या विकासाचा विचार केला. सर्वसामान्यांचे हित पाहिले. मी नउ वेळा आमदार झालो. पस्तीस वर्षाच्या राजकीय जिवनात वेगळ्या पध्दतीने निधी आणता येतो. आम्ही विकास करणारी माणसे, मी निधी देईन, पालिकेत सत्ता आल्यानंतर शहराचा कायापालट करू. रेल्वे बीडपुरती मर्यादीत न ठेवता परळीपर्यंत नेणार, बीडला विमानतळ सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू असुन जागेची पाहणी झालेली आहे. म्हाडा या घर मिळणा या योजनेसह विकास कामे व विवीध योजनांचा पाढा ना. अजित पवार यांनी मतदारांसमोर वाचला. त्याचबरोबर चांगले लोक निवडूण द्या, भ्रष्टाचार करणारे आणि शहराचे वाटाळे करणाऱ्यांना घरचा रस्ता दाखवा तसेच मोकाट जनावरांचा प्रश्न मार्गी लागेल असे सांगीतले. त्याचबरोबर नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलताताई पारवे यांचेसह सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या नावांचा उल्लेख करत सुज्ञ मतदार राजाने घड्याळीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन ना. अजितदादांनी केले. यावेळी व्यासपिठावर राज्याचे माजी मंत्री नवाब मलिक, माजी आमदार तथा निरिक्षक संजय दौंड, शिवसंग्रामच्या नेत्या ज्योती मेटे, आ.विजयसिंह पंडित, राष्ट्रवादीचे नेते अमरसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, मोईन मास्टर, फारूक पटेल, कल्याण आखाडे, भागवत तावरे, शेख मुजीब, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, दिलीप गोरे, शेख तय्यब, शेख निजाम यांच्यासह नगरसेवक पदाचे सर्व उमेदवारांसह आदी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री फडणवीस

जाहीर सभेमुळे भाजपच्या प्रचाराला मोठी ऊर्जा मिळणार असून, पक्षाच्या पारड्यात निर्णायक मताधिक्य पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नगरपालिका निवडणुकीसाठी भाजपने विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवून प्रचाराचा वेग वाढवला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेमुळे मतदारांमध्ये सकारात्मक संदेश जाण्याची अपेक्षा भाजप कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे. या सभेच्या माध्यमातून शहरातील विकासकामे, पुढील नियोजन तसेच केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची माहिती थेट नागरिकांपर्यंत पोहोचवली जाणार आहे. दरम्यान, मुख्यमंत्री, मंत्री, आमदार आणि स्थानिक नेत्यांच्या उपस्थितीत होणारी ही सभा निवडणुकीच्या प्रचारात निर्णायक ठरण्याची शक्यता असून, बीडच्या राजकीय वातावरणात मोठी हालचाल निर्माण झाली आहे.

चौकट

विजय संकल्प सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जाहीर सभेसाठी लवकरच स्थळ निश्चित केले जाईल. या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, शहराध्यक्ष अशोक लोढा यांनी केले आहे.

## आ.सुरेश धस

आपल्याला ही माहिती मिळाल्याचंही त्यांनी सांगितलं. बुधवारी सायंकाळी ७ वाजता माझे पतीसोबत फोनवर बोलणे झाले होते, रात्री नऊ वाजेपर्यंत ते घरी येणार असं त्यांनी सांगितलं होतं. त्यानंतर, त्यांच्यावर हल्ला झाल्याचे मला समजल्याचे राम खाडे यांच्या पत्नी तुळसा खाडे यांनी सांगितले. आता, ॲड. असीम सरोदे यांनही सुरेश धस यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. आमदार सुरेश धस यांच्यापासून आपल्या जीवाला धोका असल्याचे त्यांनी म्हटले. बीड जिल्ह्यात राम खाडे कार्यरत आहेत, गेल्या ५ वर्षांपासून माझे आणि त्यांचे संबंध आहेत. ज्यावेळेस देवस्थानच्या जमिनीच्या संदर्भातील भ्रष्टाचार त्यांनी कागदपत्रांच्या आधारे माझ्या लक्षात आणून दिला, तसेच वेगवेगळ्या ठिकाणी तक्रारी दिल्या होत्या. पोलिसांकडेही तशा तक्रारी दिल्या होत्या. राम खाडे यांच्या प्रयत्नांना यश येत नव्हते. त्यानंतर, ते माझ्याकडे आले असता, तब्बल १००० कोटींचा आर्थिक गैरव्यवहार आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून झालेला आहे. देवस्थानच्या जमिनी त्यांनी स्वत:च्या खासगी लोकांच्या नावाने त्यांनी करून घेतल्या आहेत. त्यामध्ये, प्रशासनातील अधिकाऱ्यांनी त्यांना मदत केल्याचं दिसून येत आहे. यासंदर्भात आम्ही मुंबईतील ईडीच्या कार्यालयात तक्रार दाखल केली. मात्र, ईडीनेही भाजप आमदार असल्याने कदाचित त्यांच्यावर कुठलीही कारवाई केली नाही. पोलिसांनीही दखल घेतली नाही. अखेर संभाजीनगरच्या उच्च न्यायालयात खाडे यांनी धाव घेतली. त्यानंतर, उच्च न्यायालयाच्या आदेशाने गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, कुणालाही पोलिसांकडून अटक करण्यात आली नाही.

माझ्याही जीवाला धोका – सरोदे

दरम्यान, काही महिन्यांपूर्वी राम खाडे यांच्या शेतातील शेडवर हल्ला करण्यात आला, त्यांच्या नातेवाईकांवर हल्ला करण्यात आला. राम खाडे यांनी विविध विभागात अर्ज करून, नेत्यांना भेटून स्वत:साठी संरक्षण मिळवलं. मात्र, ते संरक्षण काढून घेण्यात आलं. विशेष म्हणजे कालच राम खाडे यांच्यावर निर्घृणपणे हल्ला करण्यात आल्याची माहिती आज मला मिळाली. याशिवाय, माझ्या देखील जीवाला धोका असल्याचं असीम सरोदे यांनी सांगितलं. राम खाडेंसारख्या व्यक्तीचं संरक्षण झालं पाहिजे, अशी भावनाही सरोदे यांनी व्यक्त केली.

## सोळंके रोज दीड

आमदार प्रकाश सोळंके यांनी गुरुवारी केले. माजलगाव शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नगराध्यक्ष व नगरसेवकपदाच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ कॉर्नर बैठकीत आमदार प्रकाश सोळंके बोलत होते. सहाल चाऊस तुम्ही मागच्या वेळेस निवडून आलात, भ्रष्टाचार करून नऊ महिने जेलमध्ये बसलात व आता उजळ माथ्याने मतदान कसे मागू शकता?. नगराध्यक्षपद ओबीसीला सुटताच सुनेचे बोगस ओबीसी प्रमाणपत्र काढण्यासाठी बीडला अर्ज केला; परंतु आम्ही तो प्रयत्न हाणून पाडला. सुनेच्या सासरी जाऊन दहा लाख रुपये खर्च करून बोगस ओबीसी प्रमाणपत्र मिळवले. हा खरा ओबीसी नसून हा ओबीसीवर हात मारत आहे.

## विकास कामांना

संख्येने उपस्थित होते. या सभेदरम्यान राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या मीनाताई अरुण कांबळे व विष्णू यादव यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी त्यांचे स्वागत करण्यात आले. बीड नगरपरिषद भाजपच्या ताब्यात आणण्यासाठी सर्वांनी जोमाने प्रयत्न करावेत, असे आवाहनही करण्यात आले. जयदत्त क्षीरसागर म्हणाले, या प्रभागातील जनता आमच्यासाठी जिवाभावाची आहे. इथून आम्हाला नेहमीच मोठे मताधिक्य मिळते. मतदारांनी आपल्या मर्जीतील, जनतेची सेवा करणाऱ्या उमेदवारांना निवडून द्यावे. या प्रभागात मोठे बाजारपेठ विकसित झाली असून आजची परिस्थिती पाहिली तर विकास झाल्याचे स्पष्ट दिसते. मूलभूत सुविधा या नगरपालिकेशी निगडित असल्याने त्या सक्षम लोकांच्या हाती देणे गरजेचे आहे. राज्यात जनहिताचे सरकार असल्याने खालपासून वरपर्यंत एकाच विचाराची सत्ता असावी. विकासकामांना अडथळा आणणाऱ्यांना घरी बसवा आणि 'कमळ' समोरील बटन दाबून तिन्ही उमेदवारांना भरघोस मतदान करा, असे आवाहन त्यांनी केले.

अण्णा, अध्यक्षसाहेबांच्या माध्यमातून विकास–डॉ.योगेश क्षीरसागर

बीड शहरात सर्वाधिक आघाडी देणारा प्रभाग म्हणजे प्रभाग क्रमांक २ असल्याचे सांगत डॉ. योगेश क्षीरसागर म्हणाले, प्रत्येक निवडणुकीत या प्रभागाने आम्हाला भरभरून पाठबळ दिले आहे. येथे जवळपास सर्वच विकासकामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे आगामी काळात पूर्ण केली जातील. या भागात मोठे सिमेंट रस्ते झाले आहेत. माळी समाजाचे दैवत असलेल्या संत सावता महाराज मंदिरासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न झाले. जयदत्त क्षीरसागर यांच्या माध्यमातून ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करून भव्य सभागृह उभारण्यात आले आहे. त्यामुळे अनेक गोरगरिबांची सामाजिक कार्ये येथे पार पडणार आहेत. या प्रभागातील काम करणाऱ्या लोकांनाच प्राधान्य देण्यात आले असून शुभम धूत, सावित्री नितीन साखरे आणि नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ. ज्योती घुंबरे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

## या फ्लॉब भुयारी गटार

आली. १६३ कोटी रुपयांची भुयारी गटार योजना आणि साधारण एवढ्याच रकमेची अमृत अटल पाणी योजनेची कामे एकाच वेळी सुरू झाली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत ही कामे करण्यात आली.

जशी अमृत अटल योजनेची शहरातील स्थिती बकाल झाली, तशीच गत भुयारी गटार योजनेचीही झाली. अमृत अटल योजना पुढे सुरू राहिली असली तरी आजही पूर्ण नाही. मात्र, भुयारी गटार योजना चार वर्षांपूर्वीच गुंडाळली आहे. १६३ कोटी रुपयांच्या निधीतून शहरात १५५ किलोमीटर अंतराची पाइपलाइन खोदून घराघरांतील सांडपाणी व स्वच्छतागृहांचे पाणी एकत्र करून, या पाण्यावर प्रक्रिया करून शुद्ध केलेले पाणी बिंदुसरा नदीत सोडायचे, असा हा मूळ प्रकल्प होता. या योजनेचा मलनि:सारण प्रकल्प परिसरातील जिरेवाडीत प्रस्तावित होता.

२०१९ मध्ये प्रत्यक्ष कामाला सुरवात झाल्यानंतर पालवण चौक, कृषी कॉलनी, पंचशीलनगर, केएसके महाविद्यालय आदी भागांत १२ किलोमीटर अंतराची पाइपलाइन खोदण्यात आली. त्यावर लोखंडी कडा असलेले सिमेंटचे ढापे टाकण्यात आले. यासाठी १८ कोटी रुपयांचा खर्चही करण्यात आला. मात्र, दोन वर्षांची मुदत असलेली योजना मुदतीनंतरही दोन वर्षे सुरू राहत अर्धवटच इझाली. १५५ किलोमीटरपैकी केवळ १२ किलोमीटरचे काम झाले आणि १८ कोटी रुपयांच्या खर्चानंतर यंत्रणेने ही योजना थांबविण्याचा निर्णय घेतला.

## क्रुर हत्येला वर्षेपूर्ण,

त्यांनी सांगितले. यावेळी मनोज जरांगे पाटील, आ.सुरेश धस, आ.संदीप क्षीरसागर यांनी भेट देवून देशमुख कुटूंबीयांचे सांत्वन केले. तसेच यातील आरोपींना कठोरात कठोर शासन व्हावे यासाठी सुद्धा सर्वांनी आपापली मते व्यक्त केली.

फाशीची शिक्षा भेटल्यावरच आमचा समाधानाचा दिवस पहिल्या दिवसापासून जो आमचा न्यायाचा लढा सुरू आहे तो अद्यापही आहे. क्रूरकर्मी लोकांना शिक्षा झाली पाहिजे, हा एकच आमचा उद्देश आहे. म्हणून आम्ही गावकरी आणि कुटुंबीय लढत आहोत. ज्यांनी वाईट कर्म केले यातला माझ्या भावाचा खून एक आहे. सगळ्या कुटुंबाला अनाथ केलं. ज्या लोकांनी निष्पाप भावाला संपवलं त्यांना फाशीची शिक्षा भेटल्यावर आमचा समाधानाचा दिवस असेल अशी प्रतिक्रिया धनंजय देशमुख यांनी दिलीय. दरम्यान, या प्रकरणात चार्जफ्रेम व्हायला वेळ लागत आहे. वेळ काढू पण केला जात आहे, परंतु १२ डिसेंबरला चार्ज फ्रेम होईल. लवकरात लवकर या प्रकरणाचा निकाल लागला पाहिजे, असे आमचे प्रयत्न असतील. असेही ते म्हणाले. फोटो व्हायरल झाल्यामुळे आम्हाला खूप त्रास भाऊ असताना आम्ही ज्या–ज्या गोष्टी करायचो त्या आम्ही करत आहोत. मी त्यांचा भाऊ असणं निमित्त आहे. आम्हाला लढण्याचं बळ गावापासून मिळालंय. लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते पाठीशी आहेत. मनोज जरांगे यांना आम्ही आमच्या अडचणी वेळोवेळी सांगतो सर्व समाजातील लोक आमच्या सोबत आहेत. त्यांच्या आठवणीत आम्ही सामाजिक कार्य करत आहोत. आम्ही कधी खचलो नाहीत, त्यांच्या आठवणीमध्ये जलसंधारणाचे काम केले, रक्तदान शिबिर घेतले. समाजकार्य करण्याची इच्छाशक्ती लागते. ती इच्छाशक्ती आम्हाला गावाने दिली. मागच्या वर्षी आमच्याकडे प्रत्येक सणाची भयानक आठवणी होत्या. मागच्या वर्षीचे प्रत्येक सणाचे फोटो व्हायरल झाल्यामुळे आम्हाला खूप त्रास झाला. दादाची कुठलीच आठवण आम्ही विसरू शकत नाही. आम्ही गावात सलोख्याने, एकोप्याने राहत होतो. गावची ताकद तुम्ही चौथा स्तंभ म्हणून सिद्ध झालाय. आज वर्षश्राद्धा निमित्त समाधान महाराज शर्मा यांचे कीर्तन आज ठेवण्यात आलेले आहे. अशी माहिती बंधू धनंजय देशमुख यांनी दिली.